नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०९/१०/२०२२ (रविवार)**

**(सायंकाळ)**

---

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे २०.०० वा. दरम्यान **रंजना नरेश खोब्रागडे (मृतक), वय ३८ वर्ष, रा. नेरला** ही आपल्या मुलाला घेउन पलंगावर झोपली असता तिच्या हातावर काहीतरी चावा घेतल्याचा भास झाला. तिने आपल्या पतीस उठवंल व सांगु लागली हाताला काहीतरी चावला फिर्यादीने पाहीले असता तिला सापाने दंश केला असे दिसत होते. तसेच लगेच फिर्यादीने तिला उपचारकामी उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे नेले असता तेथिल डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नरेश नामदेव खोब्रागडे वय ४२ वर्ष रा. नेरला यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे मो.न. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

२) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत वार्ड क्र. ३, खापरखेडा येथे दिनांक ०१/१०/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान **राहुल क्रीष्णाजी ठाकरे(मृतक), वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं ३ खापरखेडा** हा दारूच्या नशेमध्ये खापारखेडा येथील घरी हजर असतांना विषारी औषध प्राषण केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकरीता खाजगी दवाखाना खापरखेडा व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान दि ०२/१०/२२ चे १८.१० वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मेयो पोलीस बुथ नागपुर येथुन मृतकाचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार गवई पो.स्टे. खापरखेडा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि जाधव मो.नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

३) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील जाम नदीच्या पात्रात भारसिंगी येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे १६.०० वा. सुमारास फिर्यादीचा पुतन्या नामे– **प्रतिक रविन्द्र रोकडे(मृतक), वय २२ वर्ष रा.भारसिंगी ता. नरखेड** हा जामनदीच्सा पात्रात पोहण्यास उतरला असता त्यास पोहने येत नसल्याने तो पाण्यात बुडाला. दि.०८/१०/२२ रोजी दुपारी १५.०० वा. मृतक हा जामनदीच्या पात्रात मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चंद्रशेखर विश्वेश्वर रोकडे, वय ३७ वर्ष, रा. भारसिंगी ता. नरखेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अनिल जोशी मो. नं. ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर